# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर २०२३

## ठळक बातम्या

1. **राज्यसभेत महिला आरक्षणाबाबत चर्चा सुरु /'नारी शक्ती वंदन अधिनियम' विधेयक मंजूर झाल्यामुळे महिला वर्गात नवी ऊर्जा आणि आत्मविश्वास निर्माण होईल, असं पंत प्रधानांचे लोकसभेत प्रतिपादन.**
2. **NEET PG समुपदेशन 2023 साठी वैद्यकीय आणि दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमांची कट-ऑफ टक्केवारी केली कमी.**
3. **नागपूरात १ ते ८ ऑक्टोबर दरम्यान महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळातर्फे खादी आणि ग्रामोद्योग वस्तूंचे प्रदर्शन; प्रदर्शनात राहणार ५० स्टॉल्स.**
4. **नागपूरसह पूर्व विदर्भात पावसाची संततधार.**

********

**नारी शक्ती वंदन अधिनिय राज्यसभा**

लोकसभेत महिला आरक्षणाबाबतचं 'नारी शक्ती वंदन अधिनियम' विधेयक मंजूर झाल्यामुळं महिला वर्गात नवी ऊर्जा आणि आत्मविश्वास निर्माण होईल असं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज लोकसभेच्या सकाळच्या सत्रात बोलत होते. हा निर्णय देशाला नव्या उंचीवर घेऊन जाईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. हे विधेयक मंजूर करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी पाठिंबा दिल्याबद्दल, पंतप्रधानांनी त्यांचे आभार मानले. महिला आरक्षण विधेयक मंजूर होणं, हा भारताच्या संसदीय प्रवासातला सुवर्ण क्षण असल्याचं ते म्हणाले. लोकसभेत काल मत विभागणीनंतर हे विधेयक मंजूर झालं. यामध्ये ४५४ खासदारांनी विधेयकाच्या बाजूनं, तर दोन खासदारांनी विरोधात मतदान केलं होतं. दरम्यान, केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री, अर्जुन राम मेघवाल यांनी, आज महिला आरक्षणाबाबतच्या, 'नारी शक्ती वंदन अधिनियम' याबाबतचं घटना दुरुस्ती विधेयक आज राज्यसभेत मांडलं. हे विधेयक देशात महिला सक्षमीकरणाला चालना देणार असून, स्वातंत्र्याच्या अमृत काळात, भारताला विकसित देश बनवण्याच्या दिशेनं महत्वाचं पाऊल ठरेल असा विश्वास, मेघवाल यांनी यावेळी व्यक्त केला. सध्याच्या महिला आरक्षण कोट्यात, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी, ३३ टक्के आरक्षण देखील दिले जाईल आणि त्यासाठी जनगणना आणि सीमांकन आवश्यक असल्याचं मेघवाल यांनी यावेळी नमुद केलं. या विधेयकाचे राज्यसभेत समर्थन करताना काँग्रेस नेते, रणजीत रंजन यांनी महिला आरक्षण विधेयक संसदेत आणण्यास झालेल्या

विलंबावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. ऑल इंडिया तृणमूल काँग्रेसच्या खासदार डोला सेन, भाजपच्या सरोज पांडे, काँग्रेसचे प्रमोद तिवारी, समाजवादी पक्षाच्या जया बच्चन यांनी चर्चेत भाग घेतला. या विधेयकावर सध्या राज्यसभेत चर्चा सुरू आहे.

**कट-ऑफ टक्केवारी**

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं, NEET-PG समुपदेशन- २०२३ साठी, वैद्यकीय आणि दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमांची कट-ऑफ टक्केवारी कमी केली असून, आता सर्व श्रेणींमध्ये पात्रता टक्केवारी 'शून्य' करण्यात आली आहे. वैद्यकीय समुपदेशन समितीनं काल जारी केलेल्या अधिसूचनेत ही घोषणा केली. पोस्ट ग्रॅज्युएट, NEET-PG-२०२३ साठी, राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षेला बसलेले उमेदवार, आता समुपदेशन प्रक्रियेत सहभागी होण्यास पात्र असतील. वैद्यकीय उमेदवार अधिकृत वेबसाइट mcc.nic.in वर सूचना तपासू शकतात.

**"राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार"**

केंद्र सरकारनं विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रातल्या, "राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार" नावानं, पुरस्कारांचा एक नवीन संच जारी केला असून, या पुरस्काराचं उद्दिष्ट, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि नव संशोधकांनी, विज्ञान आणि तंत्रज्ञाना अधिन, नव उपक्रमाच्या विविध क्षेत्रात वैयक्तिकरित्या किंवा संघात केलेल्या उल्लेखनीय आणि प्रेरणादायी योगदानाची दखल घेणं हा आहे. या पुरस्कारासाठी राष्ट्रीय, राज्य, विविध विद्यापीठे तसंच सेवाभावी संस्थांचे संशोधक आणि भारतीय वंशाचे लोक परदेशात राहून अपवादात्मक योगदान देऊन, भारतीय समुदाय किंवा समाजाला लाभ देणारे देखील या पुरस्कारासाठी पात्र असतील.

**विजय वडेट्टीवार**

राज्यात गेल्या अडीच महिन्यांमध्ये अत्यंत कमी पाऊस पडला असून, हीच परिस्थिती राहीली तर आगामी काळात दुष्काळाचं मोठं संकट महाराष्ट्रावर येऊ शकतं ही शक्यता वर्तविण्यात येत आहे. राज्यात एक जानेवारी ते ३१ जुलै पर्यंत तब्बल एक हजार ५५५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. राज्यात शेतकरी आत्महत्या करून आपलं जीवन संपवत असून, यापरिस्थितीवरून वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवार निशाणा साधला. फक्त आश्वासन देणे हाच महायुती सरकारचा पॅटर्न असल्याची टीका विधानसभा विरोधी पक्षनेते, विजय वडेट्टीवार यांनी केली. महायुती सरकारवर वडेट्टीवार यांनी समाजमाध्यमांद्वारे टीका करतांना सांगितलं की दुष्काळी संकट आणि सरकारच्या दुर्लक्षामुळं शेतकऱ्यांच्या

आत्महत्या वाढल्याचे अहवाल पुढे आलेत. अमरावती विभागात सगळ्यात जास्त ६३७ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपले जीवन संपवले.

**महालक्ष्मी पूजन**

गणेशोत्सवाच्या मंगल पर्वात आज घरोघरी महालक्ष्मी अर्थात ज्येष्ठा कनिष्ठा गौरींचं आगमन झालं. उद्या गौरींना पंचपक्वानाचा नैवेद्य अर्पित करण्याची प्रथा असून, स्थापनेसाठी आवश्यक पूजा साहित्य, मखर, कपडे, अलंकार तसंच अन्य खरेदीसाठी गेल्या दोन दिवसांपासून बाजारपेठेत मोठी गर्दी होत आहे. गौरी पूजनासाठी निरनिराळी फळं, भाज्या, तसंच फुलांच्या बाजारपेठाही सजल्या आहेत.

**मेट्रो स्टेशन**

गणेशोत्सवा निमित्य, नागपूरकरांना कॉटन मार्केट स्टेशन भेट मिळाली असून, महालक्ष्मी स्थापनेच्या दिवशी अर्थात आज  सदर मेट्रो स्टेशन नागरिकांच्या सेवेत दाखल झालं आहे. कॉटन मार्केट मेट्रो स्टेशनला, रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी या मेट्रो स्टेशन इथून प्रवासी सेवा सुरु करण्यासंबंधीचे प्रमाणपत्र महा मेट्रोला प्रदान केले. १८ सप्टेंबर २०२३ पासून महा मेट्रोनं', मेट्रो फेऱ्यामध्ये वाढ करत, दर दहा मिनिटांनी, मेट्रो सेवा उपलब्ध केली असून कॉटन मार्केट स्टेशन सुरु झाल्यानं आणखी लाभ मेट्रो प्रवाश्याना होणार आहे.

**खादी ग्रामोद्योग मंडळ**

महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ, नागपूरच्या वतीनं, महात्मा गांधी जयंती निमित्त, एक ऑक्टोबर ते आठ ऑक्टोबर दरम्यान, खादी आणि ग्रामोद्योगी वस्तूंचं प्रदर्शन सकाळी दहा ते रात्री दहा दरम्यान नागपूरच्या झाशी राणी चौक सीताबर्डी इथ, विदर्भ हिंदी साहित्य संमेलन सभागृहात होणार आहे. प्रदर्शनाचं उदघाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार असून, यावेळी खादी ग्रामोद्योग मंडळाचे सभापती, रवींद्र साठे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार अशी माहिती, महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, आर.विमला यांनी आज दिली. त्यांनी मंडळार्फे राबविल्या जाणा-या ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीच्या विविध योजनांची माहिती देतांना, पंतप्रधान रोजगार निर्मिती, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती, मध केंद्र योजना या योजनेअंतर्गत, अर्थसहाय्य उपलब्ध करून दिलं जातं असल्याचं सांगितलं. या योजनेमार्फत उद्योजकांना बाजारपेठ मिळावी यासाठी, मंडळ अशा प्रकारचे प्रदर्शनं आयोजित करत असते असं आर. विमला यांनी स्पष्ट केलं. प्रदर्शनात महाबळेश्वर येथील शुद्ध मधुबन मध, वर्धा, नागपूर

येथील खादीचे दर्जेदार कपडे, विविध प्रकारचे मसाले, लाकडी घाण्यावरील तेल, लाकडी हस्त कलेच्या वस्तू, फायबर मूर्ती, बांबूच्या कलात्मक वस्तू, आवळा खाद्य पदार्थ, गुळ, मेणबत्ती अशा वस्तूंचं एकूण ५० स्टॉल असणार आहेत. ग्रामीण उद्योजकांना प्रोत्साहन मिळण्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन त्यांच्या वस्तू खरेदी करण्याचं आवाहन आर.विमला यांनी केलं आहे.

**अमृत कलश यात्रा**

माझी माती माझा देश, अभियानातंर्गत आज वाशीम जिल्ह्यातील नगर परिषद मंगरुळपीरच्या वतीनं, शहरातून अमृत कलश यात्रा काढण्यात आली. सहभागी नागरिकांनी कलशातील मातीला नमन करून देशासाठी लढणाऱ्या वीरांना वंदन केले. हे अभियान देशासाठी आपलं जीवन त्यागणाऱ्या शूरवीरांसाठी समर्पित असल्याची भावना व्यक्त करून या अभियानात शहरातील वार्डातील प्रत्येक नागरिकांनी योगदान दयावं असं आवाहन, नगर पालिकेच्या वतीनं करण्यात आलं. शहरातून काढण्यात आलेल्या अमृत कलश यात्रेत, शहरातील नागरिक, नगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी, नगरपरिषदेच्या शाळांचे शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येनं सहभागी झाले. चौकाचौकात अमृत कलश यात्रेचं स्वागत करण्यात आलं.

**प्रदर्शनी**

“राष्ट्रीय पोषण माह” निमित्त केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय, नागपुर, जिल्हा प्रशासन, भंडारा आणि एस.टी. महामंडळ, भंडारा यांच्या सहयोगानं आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष २०२३, मिशन इन्द्रधनुष-पाच विषयावर आधारीत, मल्टीमिडीया छायाचित्र प्रदर्शनी एस.टी.बस स्टँड, भंडारा इथ २५ से २७ सप्टेंबर दरम्यान, सकाळी नऊ ते सायंकाळी सात वाजता आयोजित करण्यात येत आहे. या प्रदर्शनीचे उद्घाटन भंडा-याचे खासदार, सुनील मेंढे यांच्या हस्ते होणार असून, अशी माहिती केंद्रीय संचार ब्यूरो, नागपूर क्षेत्रीय कार्यालयाचे, क्षेत्रीय प्रचार अधिकारी, सौरभ खेकडे यांनी दिली.

**ओबीसी आंदोलन**

राज्यात ओबीसी विद्यार्थ्यां करिता ७२ वस्तीगृहे राज्य सरकारनं मंजूर केली असून, निधी अभावी हे वस्तीगृह राज्य सरकारनं सुरु न केल्यानं, गोंदियात आज ओबीसी समाज बांधवानी शहरात भीक मागो आंदोलन करून, भिकेतून मिळालेले पैसे राज्याचे उप-मुख्यमंत्री तसंच अर्थमंत्री अजित पवार यांना मनी ऑर्डर करुन, पाठविण्यात येणार आहे. सरकारनं ओबीसी वसतिगृहकडे दुर्लक्ष

केल्यानं हा भीक मागो आंदोलन करण्यात आला असून, राज्य सरकारनं ओबीसी समजाची दखल घेतली नाही तर, भव्य आंदोलन करू असा इशारा, ओबीसी बांधवानी दिला आहे. दरम्यान, मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय म्हणजे ओबीसी आरक्षणाला धक्का आहे असा आरोप करीत यवतमाळमध्ये, ओबीसी संघटनांनी घंटानाद आंदोलन करून सरकारला ईशारा दिला आहे. महात्मा फुलेंच्या पुतळ्यासमोर हे आंदोलन करण्यात आलं.

**हवामान**

नागपूरसह पूर्व विदर्भात सर्वत्र संततधार पाऊस पडत असून, पावसाच्या दमदार पुनरागमनानं वातावरणात गारवा वाढला. उकाड्यापासून दिलासा मिळाला असून, आज आणि उद्या, विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट तर गोंदिया आणि गडचिरोलीला आज अतिवृष्टीचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागपुरात आज सकाळपासून थोड्या थोड्या वेळानं हलक्या ते मध्यम स्वरूपाची पर्जन्यवृष्टी होतं असून, प्रदीर्घ विश्रांती नंतर, वाशीम जिल्ह्यांत पावसाला जोरदार सुरूवात झाली. जिल्ह्यातील वाशिम, कारंजा, मालेगांव, रिसोड आणि मंगरूळपीर तालुक्यांत, बहुतांश ठिकाणी पाऊस झाला. ज्यामुळं खरिपाच्या पिकाला जीवदान मिळालं आहे. चंद्रपूर जिल्ह्यात इरई धरणातील पाण्याची पातळी स्थिर ठेवण्यासाठी धरणाचे दोन दरवाजे काल सायंकाळी उघडण्यात आल्याची माहिती, प्रशासकीय सूत्रांनी दिली. चंद्रपूर जिल्ह्यात आज सकाळपासून बहुतांश भागात पावसाचं पुन्हा आगमन झालं असून, काही सखल भागात पाणी शिरल्याचं वृत्त आहे. शेती पिकांसाठी हा पाऊस उपयुक्त असल्यामुळं बळीराजा सुखावला आहे. बंगालच्या उपसागरामध्ये, कमी दाबाचं क्षेत्र निर्माण झाल्यानं, मान्सून सक्रिय झाला असून, महाराष्ट्रात चांगल्या पावसाची आशा पल्लवीत झाल्या आहेत. आज पासून महाराष्ट्रात जोरदार पाऊस होईल असा अंदाज, हवामान खात्यानं आधीच वर्तविला आहे. दरम्यान, आगामी काही तासात विदर्भातील अकोला, अमरावती, वर्धा आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी तर यवतमाळ, चंद्रपूर इथं काही ठिकाणी, भंडारा, गोंदिया, वाशीम, बुलढाणा आणि गडचिरोली जिल्ह्यांत, सर्वत्र विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

********